# आळंदी नगरपरिषद आळंदी ,आळंदी देवाची
## ता. खेड, जि. पुणे.

Email- alandimc2@gmail.com


जा.क्र./आंनप/आरोग्य/१९१२/२०२१ — दि. २५/०२/२०२२

प्रति,

मा. कुलसचिव,

एम.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय,

आळंदी, ता.-खेड, जि.-पुणे.

**विषय :-** आपली MIT अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात Butterfly Garden विकसित करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, आपल्या महाविद्यालयाच्या निसर्गरम्य परिसरात Butterfly Garden विकसित केल्यास जैवविविधतेच्यादृष्टीने आपल्या महाविद्यालयाचा परिसर एक आकर्षण म्हणुन विकसित होईल. अशा प्रकारचे Butterfly Garden विकसित करण्यासाठी काही विशिष्ट प्रकारच्या वनस्पती व फुलझाडांची लागवड करणे आवश्यक आहे. आपल्या परिसरातील एका ठरविक भागत अशा वनस्पतींची लागवड केल्यास त्या वनस्पतींच्या सुगंधाने विविध प्रकारची फुलपाखरे त्याकडे आकर्षित होतील. याकरिता आवश्यक असनारे वृक्ष नगरपरिषदेमार्फत लावण्यात येतील. आपल्याकडे बागबगीचा देखभाल दुरूस्तीकरिता पूर्वीपासुनची यंत्रणा उपलब्ध असल्याने आशा ठिकाणची उत्तमरित्या काळजी घेणे शक्य होईल.

याकरिता आपल्या महाविद्यालयास माझी वसुंधरा 'पर्यावरण संवर्धक' म्हणून गौरविण्यात येईल. याबबत आपणास काही अतीरिक्त माहिती किंवा सल्ला/मार्गदर्शन आवश्यक असल्यास नगरपरिषदेसोबत संपर्क साधावा. नगरपरिषद आपल्यापरिने आवश्यक ती मदत पुरवेल.

(अंकुश जाधव)
मुख्याधिकारी
आळंदी नगरपरिषद, आळंदी

आळंदी नगरपरिषद आळंदी देवाची स्थापना १८६९

MIT Academy of Engg.
Alandi (D), Pune-412105.
25 FEB 2022
INWARD No.: 1259
SIGN:

MIT | Academy of Engineering

Ref: MITAOE/REG/089/2022

दिनांक : १६.०३.२०२२

प्रति,
मा.मुख्याधिकारी साहेब,
आळंदी नगरपरिषद,
आळंदी देवाची.

विषय : एम.आय.टी.एओई.महाविद्यालयाच्या परिसरात फुलपाखरू बाग (Butterfly Garden) विकसित बाबत.

संदर्भ : जा.क्र./आनप/आरोग्य/१९१२/२०२१ दि. २५/०२/२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपण दिलेल्या पत्रानुसार एम.आय.टी एओई. महाविद्यालयाच्या परिसरात फुलपाखरू बाग (Butterfly Garden) विकसित करण्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे महाविद्यालय आपले आभार मानत आहे. यामुळे महाविद्यालयाची शोभावाढीसाठी मदत होणार आहे.

महाविद्यालयाच्या परिसरात काही विशिष्ट प्रकारच्या वनस्पती व फुलझाडांची वृक्ष नगरपरिषदेमार्फत देण्यात यावे. महाविद्यालय कडे बागबगीचा देखभाल दुरूस्ती यंत्रणा उपलब्ध असल्यामुळे उत्तमरित्या काळजी घेणे शक्य होईल.

प्रा.एस.एम.भगत
रजिस्ट्रार

16/03/22
डॉ.एन.एम.राणे
उपसंचालक

Copy To: Director Office (for information)